मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# के.एस.के.डब्ल्यू.महाविद्यालय, नाशिक

पदवी परीक्षेसाठी सादर केलेल्या अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष

२०२१-२२

संशोधन विषय

## परिसर सर्वेक्षण ( पांडवलेणी )


सादरकर्ता

(A) चि. पवन सुभाष रणबावळे

39/50

# अनुक्रमणिका


- इतिहास
- विषयाची प्रस्तावना
- संपूर्ण विषयाची संशोधनाची माहिती
- स्वरूप
- निष्कर्ष
- संदर्भ आणि नोंदी


पांडवलेणी
Pandav
Caves
GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
WPVX+576, Buddha Vihar, Pathardi Phata, Nashik,
Maharashtra 422010, India
Lat 19.943547°
Long 73.747538°
21/06/22 08:13 AM
Google

# प्रस्थावना

नाशिकमधील पांडव लेणीला पूर्वी '**त्रैराष्मी लेणी**' म्हणून संबोधले जायचे. महत्वाचे म्हणजे जरी या लेण्यांना पांडवलेणी असे नाव असले तरी या लेन्या महाभारतातील पांडवांशी कोठेही संबंधित नाहीत. तरी देखील, या ठिकाणी काही काळ पांडव वास्तव्यास होते म्हणून त्यांना पांडवलेणी असे म्हणतात अशी माहिती हि (अफवा) ऐकिवात आहे. तर या लेण्यांचा इतिहास खालील प्रमाणे आहे.

१. या लेण्यांना पुंड्र असे संबोधले जायचे. ज्याचा अर्थ पाली भाषेत अर्थ आहे "पिवळ्या रंगाचा रंग". कारण लेण्यांमध्ये "चिवरा किंवा पिवळे वस्त्र" परिधान करणारे बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान होते. पुढे, पुंड्र हा शब्द बदलून पांडू गुहा झाला (प्राचीन स्मारक अधिनियम २६ मे १९०९ नुसार). अनेक दशकांनंतर लोकांनी त्याला **पांडव गुहा** असे संबोधण्यास सुरवात केली

# विषयाची उद्दिष्ट्ये

- सुमारे २५०० वर्षापूर्वींचीयेथे जो पाली भाषेतील . वर्षापूर्वीचीच २०००शिलालेख आहे त्यावरुन ही लेणी असल्याचेनिश्चित समजले जाते.
- बुध्दस्तुप, भिक्षूंची निवासस्थाने, बुध्दबोधिसविता, मणिभद्रजी, माता अंबिकादेवी यांच्या मूर्त्या, पाच पांडवसदृशमूर्त्या, भीमाची गदा, कौरव मूर्त्या, इंद्रसभा, देवादिकांच्या मूर्त्या या सर्व लेण्यात आहेतमूर्त्यां .ची शिल्पकता वाखाणण्यासारखी आहे
- या सर्वांचा सविस्तरपणे अभ्यास करता यावा हे या प्रकल्पासाठीचे मुख्य उद्दिष्टे आहे .


# इतिहास

- त्रिरश्मी बौद्ध लेणी ही सुमारे इ.स. पूर्व २००च्या दरम्यान खोदलेली बौद्ध लेणी आहेत. भारत सरकारने या लेण्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून दिनांक ३ एप्रिल, इ.स. १९१६ रोजी घोषित केले आहे. सातवाहन राजांनी ही लेणी खोदण्यासाठी वेळोवेळी दान दिले असा उल्लेख येथील शिलालेखांत आढळून येतो.
- त्रिरश्मी बौद्ध लेणी
- सातवाहन आणि क्षत्रप या राजवंशाने त्रिरश्मी लेणी कोरण्यास मदत केली होती. येथील शिलालेख हे त्रिरश्मी लेण्यांचा इतिहास सांगणारा मोलाचा स्रोत आहे. नाशिक या भूभागावर सातवाहन राजांचे अधिराज्य असल्याचे पुरावे पाहायला मिळतात. नाशिकचा उल्लेख शिलालेखांतून वाचायला मिळतो.


GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
WPVX+576, Buddha Vihar, Pathardi Phata, Nashik,
Maharashtra 422010, India

# स्वरूप/महत्व

* त्रिरश्मी लेणीसमूहात अनेक लेणी असून काही लेण्यांत स्त्रियांचे अलंकार आणि वस्त्रे अतिशय कलाकुसरीनी कोरलेली आहेत. या गुहांमध्ये संपूर्ण सुस्थितीतले एक प्रमुख चैत्यगृह आहे. त्याचे पूर्व दिशेचे प्रवेशद्वार चांगल्या स्थितीत आहे.
* [पूर्व दिशेचे प्रवेशद्वार]



* त्रिरश्मी बौद्ध लेण्यांचे पूर्व दिशेचे प्रवेशद्वार - सकाळचे दृश्य
* पश्चिमेकडील काही लेण्यांचे बांधकाम अर्धवट राहिलेले आहे.
* अधिक माहिती

- या लेणी पाहण्यास फी आकारली जाते. या टेकडीवर प्राचीन पाण्याची टाकी आहेत, परंतु ही पिण्याच्या पाण्याची सोय नसू शकते.
- या टेकडीवर आता वनखात्याने वृक्षराजी वाढवली आहे.

- [नाशिक शहराचे विहंगम दृश्य]
- त्रिरश्मी लेण्यांवरून नाशिक शहराचे विहंगम दृश्य दिसते. टेकडीखाली बुद्ध विहार व दादासाहेब फाळके स्मारक आहे. त्रिरश्मी बौद्ध लेण्यांवर जाण्यासाठी पायर्‍यांची बांधलेली वाट आहे. वर चढण्यास सुमारे ३० मिनिटे वेळ लागतो.
- वाहतूक व्यवस्था

- पंचवटी, मध्यवर्ती बसस्थानक तसेच नाशिकरोड येथून बौद्ध लेण्यांसाठी बसेस सुटतात. अंबडला जाणार्‍या बसने येथे उतरता येते. तसेच नाशिक दर्शन ही बसही येथे आपला थांबा घेते.

- **त्रिरश्मी बुद्ध लेणी** हे त्रिरश्मी लेणी विषयीचे एक मराठी पुस्तक आहेअतुल . भोसेकर यांनी लिहिलेले हे पस्तक नाशिकच्या बौद्ध साहित्य प्रसारक मंडळाच्या बौद्ध लेण्यांवरती पुस्तक शृंखलेतील पहिले पुस्तक आहे या . .पुस्तकात त्रिरश्मी लेण्यांचा इतिहास आणि चित्रे आहेत

- भारत सरकारने या लेण्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून दिनांक ३ एप्रिल, इ .रोजी घोषित केले आहे १९१६ .स .सातवाहन राजांनी ही **लेणी** खोदण्यासाठी वेळोवेळी दान दिले असा उल्लेख येथील शिलालेखांत आढळून येतो.

- पश्चिम भारतातील एक महत्त्वाचा हीनयान (थेरवाद) व महायान लेणी-समूह. या लेणी नाशिक शहरापासून पश्चिमेला सुमारे ८ किमी. अंतरावर मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगत आहेत.

- **पांडवलेणीकडे जाणारी झाडीभरली वाट**


  वास्तविक पांडवलेणीचा आणि पांडवांचा काहिही संबंध नाही. पांडवलेणी ही सातवाहन आणि क्षत्रप कालखंडात खोदली गेली. इथल्या कोरीव मूर्तींना पांडव समजले गेले तसेच हे अद्भूत काम पांडवांशिवाय कोणीही करू शकत नाही हा पूर्वापार समज यामुळेच या बौद्ध लेणींना पांडवलेणी हे नाव पडले.

- २. अशा स्वरूपाच्या काही शिल्पांमुळेच या लेण्यांना पांडवलेणी असे संबोधले गेले.

  पांडवलेणीच्या प्रवेशद्वारातून आत शिरताच प्रथम दर्शन होते ते १० व्या क्रमांकाच्या लेण्याचे. हे लेणे नहपानाचे लेणे अथवा नहपानाचा

विहार म्हणूनही प्रसिद्ध आहे. स्तंभ, ओसरी, कोरीव शिल्पेम विहार, आतल्या खोल्या अशी याची रचना. ओसरीतील सबंध भिंतीवर विदेशी क्षत्रपांचे शिलालेख आहेत. क्षत्रप हे शक, ग्रीस, इराण मधून आलेले.पण इथल्या संस्कृतीत विरघळून गेलेले. त्यांचे येथील शिलालेख हे ब्राह्मी संस्कृतात असून मुख्यत्वे त्यांनी दिलेल्या दानाचे आहेत. नहपान हा इराणी शब्द असून नह म्हणजे जनता व पन म्हणजे रक्षणकर्ता. नहपान हा गौतमीपुत्र सातकर्णीच्या समकालीन.

**४ व ५. गज, वृषभ, सिंहशिल्पे (पाठीमागील भिंतीवर क्षत्रपांचे शिलालेख दिसत आहेत)**



- इथे ओसरीतील स्तंभांवर पुढील बाजूस सिंह, गज, वृषभ शिल्पे कोरलेली आहेत. पण खरी गंमत आहे ती स्तंभांच्या मागील बाजूस ओसरीतील भागात.

- इथे वरच्या भागाकडे नीट निरखून पाहिले असता काहिशी वेगळी शिल्पे दिसतात. शिर गरूडाचे आणि शरीर सिंहाचे अशी ही प्रतिमा. हा आहे ग्रिफिन, एक ग्रीक उपदेवता.


- पुढच्या स्तंभावर तर अजून एक आश्चर्यचकित करणारे शिल्प सामोरे येते. हे शिल्प आहे मानवी शिर असणारे आणि शरीर मात्र सिंहाचे. तोच तो इजिप्तच्या पिरॅमिडजवळ असणारा चिरपरिचित स्फिंक्स.

  स्फिंक्स आणि ग्रिफिन या दोन्ही प्राचीन ग्रीक दंतकथांमधील देवता. त्यांचा पांडवलेणीतील समावेश दाखवतो तो प्राचीन काळात चालत असलेल्या पाश्चिमात्यांबरोबर चालत असणाऱ्या व्यापाराचा पुरावाच. व्यापाऱ्यांबरोबरच संस्कृतींमधला प्रवास, आदानप्रदानही इथे अधोरेखीत होते.

- हे सर्व पाहून विहारात प्रवेश केला, हा विहार प्रशस्त, बरेच कक्ष असलेला व कसलाही आधार नसलेला. सभांडपात समोरच्या भिंतीवर स्तूपाची रचना आणि त्याच्या आजूबाजूला काही मूर्ती कोरल्या आहेत. महाराष्ट्रातील, किंबहुना भारतातील हा लेण्याद्रीनंतरचा सर्वात मोठा विहार. विहारातून बाहेर आलो, ह्या नहपान विहाराच्या आजूबाजूला काही दुमजली विहार आहेत व जवळच चैत्यगृहही आहे.

❖ आता पाहणार होतो ते गौतमीपुत्र सातकर्णीच्या पराक्रमाची यशोगाथा असलेले ३ ऱ्या क्रमाकांचे महाराष्ट्रातील कदाचित सर्वात महत्वाचे असे देवीलेणे. हे लेणे खोदवले आहे ते गौतमीपुत्राची माता गौतमी बलश्री हिने आणि तिचा पौत्र वासिष्ठिपुत्र पुळुवामी याने. गौतमी बलश्री स्वतःला महादेवी म्हणवून घेत असे म्हणूनही हे देवीलेणे.

❖ १२. देवीलेणीचे मुखदर्शन



❖ इथल्याही स्तंभांवर ग्रिफिन, गज, वृषभ शिल्पे कोरलेली आहेत. या सर्व स्तंभांच्या दर्शनी बाजूवर चौथऱ्याच्या खाली भारवाहक यक्ष कोरलेले आहेत. त्यांच्या खांद्यावर रथाचे ओढायचे आडवे खांब कोरलेले आहेत जणू हा लेणारूपी रथच ते आपल्या खांद्यांवर वाहात आहेत.

❖ इथेही ओसरीतल्या भिंतीवर गौतमी बलश्रीने कोरलेले गौतमीपुत्र सातकर्णीची महती सांगणारे शिलालेख आहेत ज्यांचा महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाच्या शिलालेखांमध्ये समावेश होतो.गौतमीपुत्र सातकर्णी हा त्याकाळचा भारतातील सर्वात सामर्थ्यवान राजा. त्याच्या उदयाच्या वेळी सातवाहन साम्राज्य क्षीण झाले होते, जुन्नर, नासिक इ. बहुतांश भाग क्षत्रपांनी गिळंकृत केला होता. गौतमीपुत्राने नहपान क्षत्रपाच्या विरोधात जोरदार आघाडी उघडून नासिक जवळच्या सह्याद्री रांगांमध्ये त्याचा संपूर्ण पराभव केला त्याचे शिलालेख या लेणीमध्ये कोरले गेलेले आहेत.हे युद्ध अतिसंहारक झालेले दिसते कारण यात नहपानाचे संपूर्ण क्षहरात कूळ नष्ट झाले. म्हणूनच उएथील शिलालेखात त्याला '*क्षहरात वंस निर्वंस करस*' असे म्हटले आहे. त्याने नहपानाकडून जिंकलेल्या भूप्रदेशाचे वर्णनही प्रस्तुत शिलालेखात देण्यात आलेले आहे. तो प्रदेश म्हणजे अपरांत (उ. कोकण), अश्मक(नांदेड), मूलक(औरंगाबाद, बीड), ऋषिक (खानदेश), विदर्भ, सेटगिरी (जुन्नर), कृष्णागिरी (कान्हेरी), सह्याद्री, कुकुर (आग्नेय राजस्थान), आकारवंती (माळवा), अनूप (मध्यप्रदेश), पारियात्र(अबू पर्वत), सौराष्ट्र, विंध्य, श्रीशैल, मलय, महेंद्र (ओरीसा) इ.

# निष्कर्ष

- पांडव लेणी च्या डोंगरावर स्वच्छता राखली पाहिजे सरकारने त्यासाठी कर्मचाऱ्यांची सोय करावी .
- जुने शिलालेख जतन झाले पाहिजे..
- ब्राम्ही लिपीचे तेथील वाचन झाले पाहिजे
- लेण्यावर संशोधन झाले पाहिजे
- तेथे अभ्यास केंद्र झाले पाहिजे
- जनतेस लेण्यांची माहिती समजण्यासाठी माहिती फलक लावले पाहिजे
- शाळा महाविद्यालयानी तेथे सहल काढली पाहिजे.ज्ञान दिले पाहिजे
- गाईड प्रशिक्षित नेमले पाहिजे
- जनतेने स्वच्छता ठेवली पाहिजे
- सरकारने याकडे लक्ष देऊन तेथील प्रश्न सोडविले पाहिजे
- बौद्ध भिक्कूनसाठी विहार तयार केले पाहिजेत .

# संदर्भ

त्रिरश्मी बुद्ध लेणी हे त्रिरश्मी लेणी विषयीचे एक मराठी पुस्तक आहे . अतुल भोसेकर यांनी लिहिलेले हे पस्तक नाशिकच्या बौद्ध साहित्य प्रसारक मंडळाच्या बौद्ध लेण्यांवरती पुस्तक शृंखलेतील पहिले पुस्तक आहे या . .पुस्तकात त्रिरश्मी लेण्यांचा इतिहास आणि चित्रे आहेत


https://nashik.gov.in/mr/tourist-place

https://www.inmarathi.com/147054/information-about-pandavleni-caves-near-nashik/

https://mr.wikipedia.org/wiki/


39/50 (A)